**सी.एन.आर.क्र. एम.एच.एस.आय ०९–०००१४४–२०१५**

**नियमित दिवाणी दावा क्र.३१/२०१५**

**निशाणी क्र.६३ वरील आदेश**

प्रस्ततुचा अर्ज वादी यांनी प्रतिवादी क्र.१ब यांचे अज्ञान पालनकर्ते म्हणून प्रतिवादी क्र.१अ पुर्वा रामजी खोत यांची नेमणुक करण्यात यावी यासाठी दाखल केला आहे.

२. वादी यांनी असे कथन केले आहे की, सदर दाव्यातील प्रतिवादी क्र.१ब पियुष रामजी खोत हा अज्ञान असून प्रतिवादी क्र.१अ पुर्वा रामजी खोत ही त्याची आई असून त्याचा सांभाळ करत आहे. प्रतिवादी क्र.१ब व प्रतिवादी क्र.१अ यांचे परस्पर विरोधी हितसंबंध नाहीत. तसेच प्रतिवादी क्र.१अ ही प्रतिवादी क्र.१ब याची अज्ञान पालनकर्ती म्हणून सांभाळ करण्यास तयार असल्याने प्रतिवादी क्र.१अ हीची प्रतिवादी क्र.१ब याची अज्ञान पालनकर्ती म्हणून नेमणूक करण्यात यावी.

३. प्रस्तुत प्रकरणी प्रतिवादी क्र.१अ यांना नोटीस पाठविण्यात आली. प्रस्तुत नोटीस नि.क्र.६८ वरील दाखल्याचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, प्रतिवादी क्र.१ब यांच्या करिता प्रतिवादी क्र.१अ अज्ञान पालन म्हणून कार्य करण्यास संमती दिली आहे. प्रस्तुत दाखल्यास बेलिफ यांचे शपथपत्र जोडण्यात आले आहे.

४. अर्जाचे तसेच दाखल्याचे अवलोकन केले. वादी तर्फे वकील यांचा युक्तीवाद ऐकला. दाव्याचे व अभिलेखाचे अवलोकन केले. प्रस्तुत दावा हा वादी यांनी निरंतर ताकिदी करिता दाखल केलेला आहे. प्रतिवादी क्र.१ब हा अज्ञान आहे. तसेच प्रस्थावित पालनकर्ती ही प्रतिवादी क्र.१ब याची आई आहे. त्यामुळे त्या निश्चीतच प्रतिवादी क्र.१ब याच्या हिताचे निर्णय घेऊन त्याच्या हिताचे संरक्षण

प्रतिवादी क्र.१अ करतील याची खात्री वाटते. वरील सर्व परिस्थीतीचा विचार करता मी खालील प्रमाणे आदेश करत आहे.

## **आदेश**

१. अर्ज नि.क्र.६३ मंजूर करण्यात येतो.

२. प्रतिवादी क्र.१अ पुर्वा रामजी खोत यांना प्रतिवादी क्र.१ब पियुष रामजी खोत यांच्या पालनकर्ती म्हणून नेमणुक करण्यास परवानगी देण्यात येते.

SHRIKANT SHIVPUTRA PACHANDI

Digitally signed by SHRIKANT SHIVPUTRA PACHANDI
Date: 2025.12.04 15:10:42 +0530

( श्रीकांत एस.पचंडी )

दिनांकः०४/१२/२०२५ दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर देवगड